यशाचा मनसोक्त आनंद घेण्यासाठी अपयश आणि कठीण परिस्थिती यांची अत्यंत गरज असते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शुक्रवार ७ फेब्रुवारी २०२५ | अंक ६० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर

आरोपांची चौकशी सुरू

या प्रकरणी इंटरनॅशनल टुरिझम प्रायव्हेट लिमिटेड संचालक अनिल मिश्रा आणि त्यांचा मुलगा अभिषेक मिश्रा आणि इतरांविरुद्ध बीएनएस कलम ३१८ (४), ३१९ (२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या या आरोपांची चौकशी सुरू आहे. भारतीय जनता पक्षाच्या चित्रपट आघाडी संघटनेचे महाराष्ट्र अध्यक्ष समीर दीक्षित यांच्या वक्तव्याच्या आधारे एफआयआर नोंदविण्यात आला आहे. आम्ही समीर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आणि जबाबाच्या आधारे गुन्हा दाखल केला आहे आणि निवेदनात केलेल्या दाव्यांचा तपास करत आहोत, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

दादासाहेब फाळकेंच्या नावाने चित्रपट महोत्सव, शासनाची फसवणूक

आयोजकांविरोधात गुन्हा दाखल

मुंबईतील वांद्रे भागातील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये आयोजित करण्यात येत असलेल्या ङ्कदादासाहेब फाळके आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाफ्च्या आयोजकांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मुंबईतील वांद्रे पोलिसात सरकारची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. भारतीय जनता पक्षाच्या चित्रपट आघाडी संघटनेचे महाराष्ट्र अध्यक्ष समीर दीक्षित यांनी दिलेल्या तक्रारीनुसार हा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

नेमकं काय घडलं ?पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबईतील वांद्रे परिसरात एका पंचतारांकित हॉटेलमध्ये दादासाहेब फाळके आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव पुरस्कार आयोजित केला जात असल्याची माहिती भारतीय जनता पक्षाच्या चित्रपट आघाडी संघटनेचे महाराष्ट्र अध्यक्ष समीर दीक्षित यांना मिळाली होती. येत्या १९ आणि २० फेब्रुवारी रोजी हा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे, असे त्यात नमूद करण्यात आले होते. हा कार्यक्रम इंटरनॅशनल टुरिझम फेस्टिव्हल प्रायव्हेट लिमिटेडकडून आयोजित केला जाणार होता.इंटरनॅशनल टुरिझम फेस्टिव्हल प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचे संचालक अनिल मिश्रा आणि त्यांची पत्नी आहेत. अनिल मिश्रा यांनी इंटरनेटच्या माध्यामातून या कार्यक्रमाचा प्रचार केला. त्याने त्यांच्या वेबसाईटवर राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री आणि पर्यटन मंत्री धर्मेंद्र प्रधान आणि दिवंगत माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्यातर्फे देण्यात आलेल्या शुभेच्छा अपलोड केल्या आहेत. तसेच हा कार्यक्रम राष्ट्रपती भवनातर्फे आयोजित करण्यात



येणाऱ्या राष्ट्रपती भवनाच्या पुरस्काराच्या कार्यक्रमाचा भाग आहे असे दाखवण्याचा प्रयत्न करण्यात आला, असा आरोप समीर यांनी केला आहे. प्रति जोडप्यासाठी २.५ लाख रुपयांपर्यंत तिकीट दर अनिल मिश्रा याने व्हॉट्सॲप आणि कॉलद्वारे लोकांना हा केंद्र सरकारचा कार्यक्रम असल्याचे सांगितले. हे सांगून त्याने १२ मोठ्या कंपन्यांकडून प्रायोजकत्व देखील घेतले. याशिवाय उत्तर प्रदेश, राजस्थान, गुजरात, पंजाब आणि महाराष्ट्र राज्यांच्या पर्यटन विभागांकडूनही प्रायोजकत्व घेण्यात आले. तसेच अनिल मिश्राने लोकांना या कार्यक्रमासाठी बॉलिवूड अभिनेते आणि अभिनेत्री उपस्थित राहतील, असेही सांगितले. या कार्यक्रमासाठी त्याने प्रति जोडप्यासाठी २.५ लाख रुपयांपर्यंत तिकीट दर ठेवले असून असून त्याची विक्री वेबसाईटद्वारे केली जात आहे. मात्र इंटरनॅशनल टुरिझम फेस्टिव्हल प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचे संचालक अनिल मिश्रा याने सरकारची फसवणूक केली आहे, असा दावा समीर यांनी केला आहे.

बालविवाह प्रतिबंधकउपक्रमाणे ग्रामस्थांची मने जिंकली

आष्टी – तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या ॲड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालय, आष्टी यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे ब्रह्मगाव, ता. आष्टी, जि. बीड येथे सुरू असलेल्या ङ्कयुथ फॉर माय भारतफ विशेष हिवाळी शिबिराच्या दुसऱ्या दिवशी बालविवाह प्रतिबंधक मार्गदर्शन आणि नाट्य सादरीकरणाद्वारे प्रभावी जनजागृती करण्यात आली. बालविवाह रोखण्यासाठी समाजातील सर्व स्तरांवर प्रयत्न होणे आवश्यक असून, यासाठी युनिसेफ प्रकल्प समन्वयक सोनिया हंगे, समीर पठाण, ग्रामीण विकास केंद्राचे अध्यक्ष आणि बाल संरक्षण समिती सदस्य यांच्या सोबतच्या पाटोदा टीम प्रमुख विजय मिसाळ आणि शिरूर टीम प्रमुख आकांक्षा सोनवणे यांनी सखोल मार्गदर्शन केले.

रुग्णसेवेच्या क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करा

डॉ.अशोक थोरात यांचे प्रतिपादन; माऊली नर्सिंग महाविद्यालयात शपथग्रहण सोहळा

बीड : प्रतिनिधी

आज तुम्ही सर्वजण रुग्णसेवेची शपथ ग्रहण करत आहात. पुढे चालून या क्षेत्रातील सेवेतून आपली वेगळी ओळख निर्माण करावी असे प्रतिपादन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांनी केले. बीड शहरातील धानोरा रोडवरील माऊली नर्सिंग कॉलेजमध्ये आयोजीत शपथग्रहण सोहळ्यात ते बोलत होते.

माऊली नर्सिंग महाविद्यालयात विद्यार्थीनींच्या शपथग्रहण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात, रिपाइंचे युवा प्रदेशाध्यक्ष पप्पु कागदे, काँग्रेस नेते रविंद्र दळवी, राष्ट्रवादीचे नेते कल्याण आखाडे, मेट्रन रमा गिरी, इंजि.रविंद्र तोंडे, पोलिस निरीक्षक खेडकर, डॉ.अनिल सानप, डॉ.सचिन आंधळकर, डॉ.अनंत मुळे, डॉ.चोले, भाजपा नेते अजय सवाई, डॉ.वर्षा तिडके, अनिल चांदणे, भैय्या मोरे, डॉ.लक्ष्मण जाधव, विनोद मुळुक, अनिल राठोड, रणजित बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी फलोरेन्स नाईटींगेल यांचे प्रतिमापुजन व दिप प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव डॉ.महादेव मुंडे यांनी केले. यावेळी त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थीनींना रोजगाराभिमुख शिक्षण मिळावे यासाठीच आपण कार्य करत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.अशोक थोरात यांनी मी गत पंचवीस वर्षांपासून रुग्णसेवेत आहे. या क्षेत्रात कौशल्यपूर्ण कामाच्या आधारावर एक वेगळी ओळख निर्माण करु शकलो आहे. तुम्ही देखील सेवा क्षेत्रात आहात त्यामुळे एक वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी प्रामाणिक कार्य करत रहा असे मार्गदर्शन विद्यार्थीनींना केले. यावेळी राष्ट्रवादीचे नेते कल्याण आखाडे यांनी महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रात डॉ.महादेव मुंडे महत्त्वाचे योगदान देत असल्याचे सांगितले. ग्रामीण भागातील विद्यार्थीनींना विविध अभ्यासक्रम त्यांनी बीडमध्ये उपलब्ध करुन दिले असून यामुळे या विद्यार्थीनी स्वतःच्या पायावर उभा राहू शकणार आहेत. तर काँग्रेसचे नेते रवि दळवी यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की सध्याच्या स्पर्धेच्या काळात नर्सिंग क्षेत्रात अमर्याद संधी आहेत. अगदी भारतात आणि भारताबाहेर देखील या क्षेत्रात रोजगार मिळू शकतात असे सांगितले. यावेळी सुभाष धस यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.संगीता मुंडे यांनी केले. यावेळी मान्यवरांचे स्वागत प्राचार्य वृंदावनी कांबळे, प्राचार्य धनंजय मेडकर, उपप्राचार्य शुभम जोगदंड, यांनी केले. यावेळी विद्यार्थी-विद्यार्थीनींसह महाविद्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

लिंबागणेशमधील रंधवेवस्तीवर दोन दिवस रेणुका देवी तांदळा प्रतिष्ठापणा सोहळा

प्रतिनिधीं बीड

बीड तालुक्यातील लिंबागणेश जवळील रंधवे वस्तीवर देवीच्या छोट्याशा मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले असुन येत्या रविवार ९ फेब्रुवारी ते सोमवार १० फेब्रुवारी २०२५ रोजी दोन दिवस बारवातील रेणुका देवीच्या तांदळ्याचा प्राण प्रतिष्ठा सोहळा आयोजीत करण्यात आलेला आहे. बीड तालुक्यातील लिंबागणेश जवळील आहिल्यानगर – अहमदपूर महामार्गावरील रंधवेवस्तीवर बारवातील रेणुका देवीचे उपपीठ आहे. या ठिकाणी छोटेसे मंदिर उभारण्यात आले आहे. बृह्मवृंदाच्या उपस्थीतीत येत्या रविवार ९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ९ ते २ वाजेपर्यंत गणेश पुजन, पुण्याहन वाचन, दशविधी स्नान , शय्या निवास, महाआरती कार्यक्रम होणार आहे. दुसऱ्या दिवशी सोमवार १० फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ८ ते १२ वाजेपर्यंत प्रात:देवता पुजन, अग्नीमंथन, अग्नीस्थापणा, देवतास्थापण, होमहवन होणार असुन दुपारी १२.०६ ते २.०७ वाजता , पुर्णाहुती, महाआरती होणार असुन तत्पूर्वी दुपारी ठिक १ वाजता स्थिर मुहूर्तावर रेणुका देवीच्या तांदळ्याची प्रतिष्ठापणा होणार आहे. यावेळी भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यास भाविकांनी उपस्थीत रहावे असे आवाहन लिंबागणेश येथील कुलकर्णी – लिंबेकर परिवारासह ढगारे, आहेरकर, रंधवे, ढास, जगताप, पितळे, कदम, खोसे व भड परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

खो-खो महिला विश्वकप विजेत्या भारतीय संघाच्या कर्णधार प्रियंका इंगळे चे आडस येथे होणार नागरी सत्कार

कल्ले धारूर : उद्या दि.०७ फेब्रुवारी रोजी आडस परिसरातील कळमआंबा येथील कु. प्रियंका इंगळे हिच्या नेतृत्वाखालील महिलांच्या भारतीय खो-खो संघाने दिल्ली येथील इंदिरा गांधी स्टेडियमवर पार पडलेल्या विश्वकप स्पर्धेत अंतिम सामन्यात नेपाळ संघावर मात करत विश्वकप जिंकला. त्यामुळे या आपल्या भागाच्या कळमआंबा येथील प्रियंका इंगळे या लेकीचा श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था, आडस व आडस ग्रामस्थांच्या वतीने दि. ०७ शुक्रवारी सकाळी नऊ वाजता श्री छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भव्य नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण महर्षी माजी आमदार मोहनराव सोळंके उपस्थित राहणार आहेत. तर प्रमुख पाहुणे म्हणून अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन रमेशराव आडसकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्षॲड. राजेश्वर चव्हाण, जिल्हा बँकेचे संचालक ऋषीकेश आडसकर, सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन उद्धवराव इंगोले उपस्थित राहणार आहेत. तरी या नागरी सत्कार सोहळ्यास आडस व परिसरातील जनतेने उपस्थित राहण्याचे आवाहन श्री छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य राजेश देशमुख यांनी केले आह

पत्रकारांना धमकी दिल्यास ५० हजार दंड व ३ वर्षे तुरुंगवास

-पत्रकारांना धमकी दिल्यास ५० हजार दंड व ३ वर्ष तुरुंगवास.. हायकोर्टाच्या टिकेनंतर पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांनीही जाहीर केले आहे की, पत्रकारांशी असभ्य वर्तन करणा-यांना ५०, हजारांचा दंड आणि पत्रकारांशी गैरवर्तन करणा-याला ३ वर्षांचा तुरुंगवास होऊ शकतो, पत्रकाराला धमकी देणा-याना आतमध्ये तुरुंगात पाठवण्यात येईल पत्रकारांना धमकावल्या प्रकरणी अटक करण्यात आलेल्यांना सहजासहजी जामीन मिळणार नाही. सीएम म्हणाले की पत्रकार अडचणीत आल्यास त्वरित त्यांच्याशी संपर्क साधा आणि मदत करा आणि पत्रकारांशी आदराने बोला. नाहीतर तुम्हाला मोठी किंमत मोजावी लागते. गैरवर्तन करणा-या पोलीस

कर्मचा-यांवर एफआयआर नोंदवलाजाईल, अन्यथा एसपीवर कारवाई केली जाईल पत्रकार जमावाचा भाग नाहीत. ही बाब लक्षात घेऊन प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष मार्कंडेय काटजू यांनी राज्य सरकारांना ताकीद दिली असून पत्रकारांशी गैरवर्तन करू नये, अशा सूचना दिल्या आहेत पोलिस किंवा अधिका-यांवर फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल काटजू म्हणाले मजसा एखादा वकील आपल्या अशिलाच्या हत्येचा खटला न्यायालयात लढतो, तसा तो खुनी होत नाही तसेच पत्रकार त्यांचे काम सार्वजनिक ठिकाणी करतात पण ते गर्दीचा भाग नसतात त्यामुळे पत्रकारांना त्यांच्या कामापासून रोखणे हे माध्यमांच्या स्वातंत्र्यावर गदा आणणारे आहे. यासंदर्भात प्रेस कौन्सिलने देशाचे कॅबिनेट सचिव, गृह सचिव, मुख्यमंत्री, मुख्य सचिव आणि सर्व राज्यांच्या गृह सचिवांना सुचना पाठवल्या असून पत्रकारांसोबत पोलिस किंवा निमलष्करी दलांकडून होणारा हिंसाचार खपवून घेतला जाणार नाही. असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे पत्रकारांवर असे कोणतेही कृत्य होणार नाही याची काळजी सरकारने घ्यावी. पत्रकारांसोबत पोलिसांनी केलेल्या हिंसाचार हा प्रसारमाध्यमांच्या स्वातंत्र्याच्या अधिकाराचे उल्लंघन मानला जाईल, जो घटनेच्या कलम १९ए मध्ये देण्यात आला आहे आणि घटनेच्या या कलमानुसार गैरवर्तन करणा-या पोलीस किंवा अधिका-यांवर फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ७ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com

संपादकीय

व्हॅलेंटाईन डे स्वैराचाराला मोकळीक

प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं.. तुमचं आणि आमचं अगदी सेम असतं !फ असे मंगेश पाडगावकरांनी कवितेतून सांगितले असले तरी हल्लीच्या प्रेमात सुद्धा बरेच प्रकार तयार झाले आहेत. सकाम आणि निष्काम प्रेम हे त्यातील मुख्य प्रकार. आपल्यावर प्रेम आहे म्हणणारी व्यक्ती आपल्यावर निष्काम प्रेम करते कि त्यामागे तिचा काही हेतू दडला आहे हे ओळखणे आजच्या काळात अत्यावश्यक बनले आहे. प्रेमातील फसवणुकीची प्रकरणेही हल्ली वाढली आहेत. यामध्ये ब-याचदा बळी जातो तो मुलीचा. प्रेमात फसवणूक झाल्याने दरवर्षी कितीतरी मुलींचे आयुष्य उध्वस्त होते, तर कितीतरी जणी निराश होऊन मृत्यूला कवटाळतात. मुलींचे मनच मुळात भावनाशील असल्याने प्रेमात अशाप्रकारे वर्गवारी करणे प्रत्येकीला जमतेच असे नाही. मुलींच्या याच कमजोरीचा गैरफायदा घेणारे, तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिची फसवणूक करणारे, तिच्या भावनांशी खेळणारे राक्षसीप्रवृत्तीची माणसे आज चोहोबाजूंनी पसरलेली आहेत, त्याम ुळे आता मुलींना प्रेमात आंधळे होणे परवडणारे नाही. काहीजण म्हणतील प्रेम केले जात नाही, तर ते आपसूकच होते. असे असेल, तर दरवर्षी ७ ते १४ फेब्रुवारी या सात दिवसांत तरुणवर्गामध्ये उत्साहाने साजरा केला जाणारा मव्हॅलेंटाईन वीकफ्च्या उहापोह कशासाठी ? हा सप्ताह नेमका प्रेमाचा असतो कि स्वैराचाराचा ? मव्हॅलेंटाईन वीकफ्च्या स्वागतासाठी भेटवस्तूंची दुकाने मागील तीन-चार दिवसांपासून सजली आहेत, वृत्तवाहिन्यांतून सौंदर्य तज्ज्ञांना निमंत्रित करून मव्हॅलेंटाईन वीकफ्साठी मुलींनी कशा प्रकारे तयारी करावी याबाबतच्या मटिप्सफ दिल्या जात आहेत. मकॉलेज कॅम्पसफ्मध्ये सुद्धा सध्या याच विषयाची चर्चा रंगलेली दिसून येते. इंग्रजांच्या गुलामगिरीतून देशाला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्षे उलटली. मात्र त्यांच्या वैचारिक आणि सांस्कृतिकगुलामगिरीच्या जोखडातून आपणअद्याप मुक्त झालोनसल्याचा प्रत्यय दर वर्षी मव्हॅलेंटाईन वीकफ सुरु झाला कि येऊ लागतो. मव्हॅलेंटाईन डेफ्ची मक्रेझफ जेव्हढी भारतात पाहायला मिळते तेव्हढी अन्य पाश्चिमात्य देशांम ध्ये खचितच असावी. ७फेब्रुवारीपासून १४ फेब्रुवारीपर्यंत विविध मडेजफ भारतासारख्या संस्कृतीप्रिय राष्ट्रात तरुण तरुणींकडून उत्साहाने साजरे केले जातात. शहरातील ही मक्रेझफ हळूहळू ग्रामीण भागातही पसरू लागली आहे. मातृभाषेला डावलून इंग्रजी आणि कॉन्व्हेंट शाळांमध्ये मुलांना घालण्याकडे पालकांचा वाढत चाललेला कल हेच यामागील प्रमुख कारण असावे. या दिवसांत अनेक शाळा आणि महाविद्यालयांच्या आवारात शैक्षणिक वातावरण बिघडवणा-या घडामोडी घडत असतात. परीक्षेच्या तयारीच्या दिवसांत काही चंगळवादी युवक युवतींची भलतीच तयारी सुरु असते. ज्याचा परिणाम शाळा महाविद्यालयांतील अन्य विद्यार्थीवर्गावर होत असतो. अनेक ठिकाणी शाळा-महाविद्यालय प्रशासनही या गोष्टींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करते याचे खरेतर नवल वाटते. या दिवसांत मडेजफ्च्या निमित्ताने पालकांच्या पैशांची तरुणांकडून मोठ्या प्रम ाणात उधळपट्टी केली जाते. या ७ दिवसांमध्ये गर्भनिरोधक साधनांचा खपही वाढत असल्याचे एका सर्वेक्षणातून पुढे आले आहे. असल्या विदेशी भोगवादी दिवसांच्या मौजमजेमध्ये काडीमात्र रुची नसणा-या अनेक मुलींना या मडेजफ्चा कमालीचा मनस्ताप होतो. मरोज डेफ, मप्रपोझ डेफ, मप्रॉमिस डेफ, मकिस डेफ, महग डेफ, मचॉकोलेट डेफ आणि मव्हॅलेंटाईन डेफ यांसारख्या डेजच्या निमित्ताने किशोरवयीन मुलींवर घातला जाणारा दबाव त्यांच्या मानसिक आरोग्यावर घातक परिणाम करतो. कितीतरी मुली या दिवसांत वासनांधांच्या खोट्या प्रेमाला भुलतात आणि आपल्या आयुष्याची राखरांगोळी करतात. लव्ह जिहादची प्रकरणे देशाच्या कानाकोप-यातून वाढू लागली आहेत.अशांसाठी हे डेज म्हणजे मइप्सितसाध्यकरण्यासाठीमिळालेली पर्वणीच असते. प्रेमाला भारतीय संस्कृतीने नेहमीच पवित्र आणि उच्च स्थान दिले आहे; मात्र प्रेमाच्या नावाखाली घातला जाणारा बाजार आणि चालणारा स्वैराचार आपल्या संस्कृतीला नक्कीच शोभणारा नाही. भारतीय संस्कृतीवर आघात करणारा आणि युवावर्गाचे नैतिक अध:पतन करणारा मव्हॅलेंटाईन वीकफ आपल्या देशात हवा तरी कशाला ?

मराठी भाषेची सक्ती

राज्यातील देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने दोन दिवसांपूर्वी राज्यातील सर्व प्रशासकीय कार्यालयांमध्ये मराठी भाषेचा वापर सक्तीचा करणारा महत्वपूर्ण निर्णय केला आहे. काही महिन्यांपूर्वी केंद्र सरकारने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्रदान केल्यानंतर राज्यात मराठी भाषेचे संवर्धन आणि संरक्षण होण्यासाठी जे विविध उपाय योजले जात आहेत त्याचाच एक भाग म्हणून आता प्रशासकीय कार्यालयीन स्तरावरही मराठी भाषेची सक्ती करण्यात आली आहे. धोरणात्मक निर्णय म्हणून हा विषय महत्त्वाचा असला तरी महाराष्ट्रासारख्या राज्यात ज्या राज्याची राज्यभाषा ही मराठी आहे त्या भाषेचा वापर प्रशासकीय कार्यालयांमध्ये करण्याची सक्ती करावी लागते हाच मोठा विरोधाभास आहे. देशातील इतर कोणत्याही राज्यांमध्ये अशा प्रकारची परिस्थिती नाही. प्रत्येक राज्यामध्ये त्या त्या राज्याची भाषा प्रशासकीय व्यवहारांमध्ये जाणीवपूर्वक वापरली जात आहे. एवढेच नव्हे तर महाराष्ट्र-कर्नाटक सीमा वादामुळे चर्चे त असलेल्या आणि मराठी बहुल बेळगाव सारख्या शहरांमध्ये सुद्धा कन्नड भाषेची सक्ती करण्यात आली आहे. सीमा भागामध्ये अनेक लोकांना कन्नड भाषेचा गंध नसतानाही त्यांना सर्व सरकारी व्यवहार कन्नड भाषेतच करावे लागत आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारला जाणीवपूर्वक मराठी भाषेची सक्ती करण्याचा निर्णय घ्यावा लागतो या मागील वास्तवही लक्षात घ्यावे लागणार आहे. महाराष्ट्राची राजधानी असलेली मुंबई आणि पुणे, नाशिक, ठाणे, नागपूर यासारख्या महानगरांमध्ये मेट्रोपॉलिटन संस्कृती विकसित झाल्या असल्यामुळे देशाच्या कानाकोपऱ्यातून येणारे लोक या शहरांमध्ये स्थायिक होतात. त्या लोकांना मराठी भाषा येतेच असे नाही. महाराष्ट्रात कायमस्वरूपी स्थायिक होणाऱ्या लोकांनी येथील मराठी भाषा शिकून घेणे अभिप्रेत असले, तरी वर्षानुवर्षे महाराष्ट्रात राहणाऱ्या अमराठी लोकांना मराठी भाषेबाबत पूर्वग्रह आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. महाराष्ट्रासारख्या राज्यामध्ये रेल्वेचेही मोठे जाळे आहे आणि सर्वसाधारणपणे रेल्वेमध्ये काम करणारे जे अधिकारी आणि कर्मचारी आहेत ते अनेक वेळा अमराठी असल्यामुळे ते कधीही मराठी भाषेचा वापर करत नाहीत. त्यावरूनही अनेक वेळा वाद झाल्याच्या गोष्टी काही दिवसांपूर्वी समोर आल्या होत्या. महाराष्ट्राच्या प्रशासन पातळीवरही अनेक ठिकाणी इतर राज्यांतील अधिकारी आणि वरिष्ठ कर्मचारीसुद्धा नियुक्त झालेले असतात. अनेक महत्त्वाच्या सरकारी बँकांमध्ये सुद्धा उत्तर प्रदेश, बिहार किंवा मध्य प्रदेशमधील काही कर्मचारी महाराष्ट्रात काम करण्यासाठी आलेले असतात. या सर्व लोकांना मराठीचा अजिबात गंध नसतो. मुंबईसारख्या राजधानीच्या शहरात तर मराठी माणूससुद्धा हिंदी भाषेतच बोलत असतो. झेड जनरेशन म्हणून ओळखली जाणारी २००० नंतरची पिढी जाणीवपूर्वक इंग्रजी भाषेचा वापर करत असते. मराठीत बोलणे त्यांना गावठीपणाचे वाटते. मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक किंवा नागपूर या मोठ्या शहरांमध्ये नोकरीच्या निमित्ताने आलेला युवावर्ग मराठी भाषेचा वापर अजिबात करत नाही हेसुद्धा एक वास्तव आहे. या सर्व पार्श्वभूमीवर सरकारला जर जाणीवपूर्वक प्रशासकीय कार्यालयांमध्ये मराठीचा वापर सक्तीचा करायचा निर्णय घ्यावा लागला असेल, तर ते समजण्यासारखे आहे पण महाराष्ट्रातील विविध सरकारी कार्यालयात जाऊन जर पाहिले तर त्या ठिकाणी अनेक वेळा इंग्रजी भाषेतच माहिती फलक असतात. अनेकवेळा काही महत्त्वाच्या कामांसाठी लागणारे अर्जसुद्धा इंग्रजी भाषेमध्ये असतात. सरकारच्या या निर्णयामुळे या परिस्थितीमध्ये जरी बदल होणार असला तरी शासकीय पातळीवर जी मराठी वापरली जाणार आहे तीसुद्धा सर्वसामान्य नागरिकांना समजेल अशीच असायला हवी. कारण सरकारी मराठी भाषा हा एक वेगळाच विषय आहे. सर्वसामान्य सुशिक्षित नागरिकांनासुद्धा या शब्दांचा अर्थ कळत नाही, असे अनेक मराठी शब्द प्रशासकीय पातळीवर कार्यालयांमध्ये वापरले जातात. अनाकलनीय शब्द वापरण्याऐवजी सोपे आणि बोलीभाषेत प्रचलित असलेले शब्द जर प्रशासकीय पातळीवर वापरले तर तेथील कामकाज अधिक सहज आणि सुलभ होऊ शकते हेसुद्धा या निमित्ताने लक्षात घ्यावे लागेल. सध्या तरी सरकारने केवळ आपल्या अखत्यारीत असलेल्या प्रशासकीय कार्यालयांमध्येच मराठी भाषेची सक्ती केली असली तरी महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या सर्वच प्रकारच्या खासगी कार्यालयांमध्ये सुद्धा अशा प्रकारची मराठीची सक्ती करण्याची गरजही या निमित्ताने समोर येत आहे. दक्षिण भारतातील कोणत्याही राज्यांमध्ये महानगरे असो किंवा ग्रामीण भाग असो तेथे जे विविध दिशादर्शक नामफलक आढळतात ते त्या प्रादेशिक भाषेमधीलच असतात. या राज्यात जाणाऱ्या पर्यटकांची त्यामुळे कुचंबणा होत असली, तरी त्याचा कोणताही विचार तेथील राज्य सरकारे करत नाहीत. महाराष्ट्रात मात्र केवळ अभावानेच मराठी दिशादर्शक फलक आढळतात. साहजिकच दैनंदिन व्यवहारात जोपर्यंत पूर्णपणे मराठी भाषा वापरली जात नाही तोपर्यंत अभिजात भाषा दर्जा मिळूनही काही उपयोग होणार नाही हेसुद्धा सत्य आहे. अर्थात, मराठी भाषेचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी जर अशा प्रकारचे निर्णय घेतले जात असतील, तर हे निर्णय गांभीर्याने अंमलात येतील याची काळजी सुद्धा आता राज्य सरकारला घ्यावी लागणार आहे.

महाराष्ट्र अंनिस बीड जिल्हाभर शाखा स्थापन करणार ! अंधश्रध्दा निर्मूलन कार्यात सहभागी व्हा--हनुमंत भोसले

बीड- समाजातील अंशश्रद्धा दिवसेंदिवस कमी होण्यापेक्षा वाढत आहे. अध्यात्माच्या व लोकांच्या ईश्वरी श्रद्धेच्या आडून सर्वसामान्यांचे आर्थिक, लैंगिक व मानसिक शोषण करणारी वृत्ती व त्यांच्या टोळ्या मोठ्या संख्येने वाढत असल्याने याला प्रतिबंध करून त्यावर रोक लावण्यासाठी विवेकी व वैज्ञानिक दृष्टिकोन असणाऱ्या युवक-युवती व नागरिकांनी बीड जिल्ह्यात तालुका व सर्कल ठिकाणी स्थापन होणाऱ्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन संघटनेच्या शाखेत सहभागी व्हावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते व महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे बीड जिल्हा अध्यक्ष हनुमंत भोसले यांनी केले आहे. सध्या बीड जिल्ह्यात करणी, भानामती, भूतबाधा, चमत्कार अशा काल्पनिक बाबींची भीती दाखवून समाजाचे शोषण करणारे लोक व त्यांच्या समर्थकांची संख्या खूप वाढली आहे. खरे पाहता वरील बाबींची भीती दाखवून लोकांना भ्रमित करणे हा कायद्यानुसार मोठा गुन्हा आहे व त्यासाठी मोठता शिक्षेची तरतूद आहे. मात्र अशा शोषण व्यवस्थेत काम करणारे लोक यासाठी ईश्वर, दैववाद व कर्मकांडाची भीती दाखवून लोकांना आपल्या मनाप्रमाणे वागायला लावतात व त्यामोबदल्यात पैसे, महिलांचे लैंगिक शोषण व मानसिक छळ करून शोषण करतात. हा धंदा सध्या बीड जिल्ह्यात मोठता प्रमाणात फोफावत आहे. असे लोक अध्यात्म व धर्माचा आधार घेत असल्याने त्यांना विरोध करायला किंवा त्यांच्या विरोधात तक्रार करायला लोक पुढे येत नाहीत. यासाठी आता बीड जिल्ह्यातील सर्व तालुके व सर्कलच्या ठिकाणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या शाखा स्थापन करण्याचा उपक्रम हाती घेतला असून बहुजन समाजातील सामाजिक कार्याची आवड असणाऱ्या व छत्रपती शिवराय,संत तुकाराम महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर व संत गाडगेबाबा यांच्या कार्याला वाहून घेतलेल्या कार्यकर्त्यांनी आपापल्या जवळच्या शाखा कार्यकारिणीत सहभागी व्हावे असे आवाहन महाराष्ट्र अंनिस चे जिल्हाध्यक्ष हनुमंत भोसले व जिल्हा कार्याध्यक्ष प्रदीप चव्हाण यांनी केले आहे. ज्यांना महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीत काम करायचे आहे त्यांनी तात्काळ हनुमंत भोसले (9423733888) या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. संविधानातील तरतुदीनुसार अंधश्रद्धा निर्मूलन हे शासकीय धोरण असल्याने या कार्यात कायद्यानुसार शासकीय व निमशासकीय सेवेत असणारे लोक आपल्या राहिलेल्या वेळेत या कार्यात सहभागी होऊ शकतात. हे काम बीड जिल्ह्यात जोमाने व्हावे व बीड जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यात अंनिस शाखा कार्यरत असाव्यात असे नरेंद्र दाभोळकरांचे स्वप्न होते. तरी जास्तीत जास्त सामाजिक जाणिव असणाऱ्या नागरिकांनी या कार्यात सहभागी व्हावे असेही जिल्हा समितीच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.



स्वानंद सार्वजनिक वाचनालयात सुर्यनमस्कार दिन, तानाजी मालुसरे पुण्यतिथी व संत तुकाराम महाराज जयंती संपन्न.

केज/प्रतिनिधीस्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज जि. बीड येथे दिनांक ४ जानेवारी २०२५ रोजी ङ्क जागतिक सुर्य नमस्कार दिन व तानाजी मालुसरे यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.दिनांक २ जानेवारी २०२५ रोजी जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.४ जानेवारी २०२५ रोजी जागतिक सुर्यनमस्कार दिन विविध आसने करून मुला मुलींनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून सुर्य नमस्काराचे प्रात्यक्षिक केले.त्यानंतर तानाजी म ालुसरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन करणात आले.मुला - म ुलींनी तानाजी मालुसरे व सुर्यनमस्कार दिनाचे महत्व यावर उत्स्फुर्त भाषणे केली.प्रमुख पाहुणे म्हणून कल्याणी भोगनकर, साक्षी गायकवाड, कृष्णा गायकवाड, दिव्या साबळे, एस. के. वैरागे, शौर्य गायकवाड, राहण गायकवाड यांची उपस्थिती होती.

अध्यक्ष स्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, माजी प्राचार्य, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.दिनांक २ जानेवारी २०२५ रोजी ङ्क जगद्गुरू संत तुकाराम महाराज जयंती साजरी करण्यात आली. सर्व प्रथम ङ्कसंत तुकाराम महाराजङ्क यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले.संत तुकाराम महाराजांच्या प्रतिमेचे पुजन बबन पुंड, नानासाहेब जाधव, दत्तात्रय कदम, एस. के. वैरागे यांच्या हस्ते ततिमेला पुष्पहार घालून करण्यात आले.मान्यवरांनी थोडक्यात मनोगत व्यक्त केले.अध्यक्ष स्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, माजी प्राचार्य, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ७ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com

फडणवीसांवर नाराज आहात का? शिंदेंचं एका वाक्यात उत्तर

लाडकी बहीण वरून पुन्हा विरोधक सरकारच्या कोंडीचा प्रयत्न करत आहेत

लोकसभा निवडणुकीमध्ये महायुतीला मोठा फटका बसला होता, अनेक दिग्गज उमेदवारांना पराभवाचा सामना करावा लागला. मात्र त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीनं जोरदार पुनरागमन करत महाविकास आघाडीला धक्का दिला. सर्वाधिक जागा जिंकत भाजप महायुतीमध्ये मोठा पक्ष ठरला. त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. तेव्हापासूनच महायुतीमध्ये नाराजी नाट्य सुरू असल्याची चर्चा सुरू आहे. एकनाथ शिंदे हे गृहमंत्रिपदासाठी इच्छूक होते, मात्र भाजपनं गृहमंत्रिपद आपल्याकडे ठेवल्यानं ते नाराज झाले अशी देखील चर्चा सुरू होती. त्यानंतर पालकमंत्रिपदावरून देखील एकनाथ शिंदे नाराज झाल्याचं पाहायला मिळालं. त्यामुळे एकनाथ शिंदे हे देवेंद्र फडणवीस यांच्यावर नाराज आहेत का? असा सवाल उपस्थित करण्यात येत होता. अखेर त्याचं उत्तर आता एकनाथ शिंदे यांनीच दिलं आहे.एकनाथ शिंदे यांनी या सर्व शक्यता फेटाळून लावल्या आहेत. मी कोणावरही नाराज नाहीये, तुम्हाला कोणी सांगितलं की मी देवेंद्र फडणवीस यांच्यावर नाराज आहे असा सवालही यावेळी त्यांनी केला. त्यामुळे आता या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे. यावेळी बोलताना एकनाथ शिंदे यांनी म्हटलं की, तुम्हाला कोणी सांगितलं की मी देवेंद्र फडणवीस यांच्यावर नाराज आहे. काल झालेल्या कॅबिनेटच्या बैठकीला देखील आम्ही दोघे उपस्थित होतो. आम्ही दोघांनी चर्चा केली. जेव्हा मी मुख्यमंत्री होतो तेव्हा ते माझ्या मंत्रिमंडळात होते. आता ते मुख्यमंत्री आहेत तर मी त्यांच्या मंत्रिमंडळात आहे. आम्ही प्रत्येकवेळी दोघांनी एकमेकांचं समर्थन केलं आहे. महाराष्ट्राच्या विकासासाठी मी सदैव त्यांच्यासोबत उभा आहे.

सध्या लाडकी बहीण योजनेवरून पुन्हा एकदा विरोधक सरकारच्या कोंडीचा प्रयत्न करत आहेत. याला देखील एकनाथ शिंदे यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. सरकारच्या कोणत्याही योजना बंद होणार नाहीत, मी मुख्यमंत्री असताना आम्ही ज्या काही योजना सुरू केल्या होत्या त्या सुरूच राहणार आहेत. लाडकी बहीण योजना बंद होणार नसून, लाभार्थी महिलांना पैसे मिळत राहातील असंही त्यांनी यावेळी म्हटलं आहे.

मधुकर खाडे यांचे निधन

केज (प्रतिनिधी)

दि.६ : तालुक्यातील होळ येथील पैलवान मधुकर दत्तुबा खाडे यांचे गुरुवारी (दि.६) उपचारादरम्यान पुणे येथे रुग्णालयात निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ६४ वर्षे होते.

होळ येथील शिवछत्रपती क्रीडा व व्यायामशाळा, संत भगवानबाबा वारकरी शिक्षण संस्थेचे ते सचिव होते. व्यायाम शाळा परिसरातील विद्युत पोललगत असलेल्या झाडांच्या फांद्या ते स्वतः झाडावर चढून कापत होते. यावेळी विद्युत तारेला स्पर्श होऊन करंट लागल्याने ते खाली कोसळले. यावेळी त्यांच्या पाठ व पोटाला गंभीर ईजा झाली होती. उपचारादरम्यान पुणे येथे त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पोलीस दलात कार्यरत गोविंद, व्यंकटी, व्यवसायिक बालाजी ही तीन मुले आहेत. तसेच, दोन भाऊ, वडील, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर होळ येथे शिवछत्रपती क्रीडा व व्यायामशाळेसमोर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी वारकरी सांप्रदाय, कुस्ती, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील नागरिकांची उपस्थिती होती.

पाटोदा तालुक्यातील मेंगडेवाडी गावात बिबट्याच्या हल्ल्यात वयोवृद्ध महिलेचा मृत्यू ; वनविभाग व पोलीस प्रशासन घटनास्थळी दाखल :- डॉ.गणेश ढवळे

पाटोदा:- (दि.०६) पाटोदा तालुक्यातील मेंगडेवाडी गावातील उखारा शिवारात आज दि.६ गुरूवार रोजी दुपारी बिबट्याच्या हल्ल्यात श्रीमती सोजरबाई धोंडीराम बोबडे वय ६५ वर्षे या वयोवृद्ध महिलेचा मृत्यू झाला असुन या परीसरात बिबट्याची दहशत पसरली आहे. वनविभाग आणि पोलिस प्रशासनाला याची फोनवरून भगवान शिंदे यांना कळविण्यात आले आहे.

सविस्तर माहितीस्तव भगवान शिंदे यांच्या म्हणण्यानुसार श्रीमती सोजरबाई धोंडीराम बोबडे या दुपारी १२ वाजता शेतातील जनावराच्या गोठ्यात नेहमीप्रमाणे जात असतात. आज दुपारी ३ वाजता बिभिषण दासु शिंदे यांनी शेतातील जनावरे

आणण्यासाठी जात असताना त्यांच्या गोठ्याशेजारी शेतात सोजरबाई यांचे प्रेत पाहीले.त्यांच्या अंगावरील जखमावरून बिबट्याने नरडीचा घोट घेतल्याचे दिसून आले. शेतात बिबट्याचे ठसे दिसुन आले. त्यांनी सोजरबाई यांच्या नातु जगन्नाथ बबन बोबडे यांना फोनवरून कल्पना दिली.त्यानंतर घटनास्थळी ग्रामस्थांनी धाव घेतली. भगवान शिंदे यांनी पाटोदा वनविभागाचे अधिकारी आरएफओ श्रीकांत काळे (मो.नं.९०७५४९५७६१) व पोलीस प्रशासन पोलिस निरीक्षक जाधव (मो.नं. ७७२२०३५२०९)यांना फोन वरून कल्पना दिली. सायंकाळी पाटोदा पोलीस प्रशासनाचे अधिकारी पोलिस उपनिरीक्षक आदिनाथ भडके व बीट अंमलदार बाळासाहेब वाघ पाटोदा यांनी घटनास्थळी भेट देऊन स्थळ पंचनामा केला. वनविभागाचे आरएफओ श्रीकांत काळे घटनास्थळी दाखल झाले आहेत. प्रेत शवविच्छेदनासाठी पाटोदा ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले आहे.

शेतकऱ्याचा अंत पाहू नका, तत्काळ विद्युत पुरवठा सुरळीत करा:- राजेंद्र आमटे

महावितरणच विद्युत पुरवठा सुरळीत करण्याचं लेखी पत्र

बीड (प्रतिनिधी) खांडे पारगाव परिसरातील शेतकऱ्यांना विद्युत पुरवठा सुरळीत होत नसल्याने वैतागलेल्या शेतकरी, नागरिक महिला, विद्यार्थी यांच्या वतीने महा वितरण विरोधात शेतकरी आक्रोश मोर्चा, व जाहीर निदर्शने आंदोलन शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे यांच्या पुढाकाराने अधीक्षक अभियंता विभागीय महावितरण कार्यालय जालना रोड बीड येथे करण्यात आले.

महावितरण अधीक्षक अभियंता विभागीय कार्यालय जालना रोड बीड येथे प्रभारी अधीक्षक अभियंता कांबळे साहेब कार्यकारी अभियंता सानप साहेब यांना निवेदन देऊन शेतकऱ्यांनी महावितरण कार्यालय मध्ये जाहीर निदर्शने केली तीन तास शेतकरी, महिला, नागरिक यांनी ठिय्या आंदोलन केलं शेतकरी महावितरण विरोधात आक्रमक भूमिका घेतली. लेखी आश्वासन दिल्याशिवाय न उठण्याचा निर्णय शेतकरी घेतला

शेतकऱ्यांच्या भूमिके पुढे प्रशासन झुकले तत्काळ लेखी आश्वासन देत आंदोलन मघे घेण्याचे विनंती केल्यावर शेतकऱ्यांनी आंदोलन तात्पुरते स्थगित केले.

आमदार संदीप क्षीरसागर यांनी शेतकरी आक्रोश मोर्चा भेट देऊन पाठींबा दिला व अधिकारी यांना सूचना केल्या व डॉ ज्योतीताई मेटे यांनी अधीक्षक अभियंता यांना दूरध्वनी संपर्क करून प्रश्न सोडवण्याच्या सूचना केली जिल्हाध्यक्ष सुभाष जाधव शिवसंग्राम जिल्हाध्यक्ष, राजेंद्र मस्के राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष, यांनी शेतकरी आंदोलनास भेट देऊन पाठींबा दिला

अधीक्षक अभियंता महावितरण यांनी सात गावातील विद्युत पुरवठा सुरळीत केला जाईल, सात गावात नवीन विद्युत तारा बदलण्याचे काम सुरू करू ,उच्च दाबाने विद्युत पुरवठा केला जाईल, ५ चतअ ट्रान्सफॉर्मर निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यावर बसवण्याची अंमलबजावणी करू, नवीन विद्युत उपकेंद्र प्रस्ताव मागून घेण्यात येईल, शेख यांची नियुक्ती निर्णय घेण्यात येईल वरील मागण्याचे लेखी आश्वासन देत आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले

या मुळे खांडे पारगाव परिसरातील खांडे पारगाव, अंथरवान प्रिंपी, नागपूर खुर्द, उमरद खालसा, नागपूर बुद्रुक, उमरी, अंथरवान प्रिंपि तांडा वेळी शेतकऱ्याने आक्रमक भूमिका घेत

- आमदार संदीप क्षीरसागर यांनी शेतकरी आक्रोश मोर्चा भेट देऊन पाठींबा दिला.

डॉ ज्योतीताई मेटे यांनीही अधीक्षक अभियंता यांना दूरध्वनी सूचना केल्या व पाठींबा दिला

तत्काळ मागण्या करण्यात यावी असे शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, जालिंदर साळुंके,राहुल टेकाळे सचिव प्रदेश युवक काँग्रेस, सुहास पाटील,अनिल घुमरे, शिवसंग्राम सरचिटणीस, सरपंच भाई प्रभाळे, काचारू जाधव, दीपक खुराने,गणेश घोडे उमरद सरपंच, सुभाष गिराम, मनोज जाधव शिवसंग्राम , किशोर ढोकणे सरपंच, सुरेश पवार, इंद्रजित लव्हाले, वसंत शिंदे, प्रवीण शिंदे,तीर्थराज साळुंके, जांगु साळुंके,आदी सह शेकडो शेतकरी उपस्थित होते

मनुष्य जिवनात मृत्यू अटळ आहे- ह.भ.प.चौरे महाराज

केज/प्रतिनिधी:- तारामती अभिमान मुंडे यांच्या द्वितीय पुण्यतिथीनिमित्त देवगाव या.केज येथे गुरुवार (दि.५) शेवट गोड व्हावा तुकाराम महाराज यांच्या अभंगांचे निरुपण करतांना माणसाला जन्म मृत्यू अटळ असुन शेवट गोड व्हावा ह.भ.प.रामेश्वर चौरे महाराज यावेळी ते बोलत होते.यावेळी ह.भ.प. रतन महाराज सासुरेकर, विक्रम बप्पा मुंडे,यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच महिला व पुरुष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कीर्तनानंतर उपस्थितांना तुकाराम सर मुंडे यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

कडा कृषी उत्पन्न बाजार समितीला वक्फ बोर्ड चेअरमन समीर काझी यांची भेट

दौलावडगाव । मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शिंपोरा ते खुंटेफळ पाईप लाईन बोगदा कामाचा शुभारंभ बुधवारी झाले या कार्यक्रमाला बीड जिल्ह्यासह राज्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते .आष्टी तालुक्यातील ड्रीम प्रोजेक्ट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खुंटेफळ तलाव बोगदा कामाच्या भुमीपूजन सोहळ्याला महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड चेअरमन समीर काझी हे उपस्थित होते.हा कार्यक्रम आटपून जात असताना समीर काझी यांनी कडा कृषी उत्पन्न बाजार समितीला भेट देऊन शेतमाल व शेतीशी संबंधित महत्वपूर्ण घटकावर चर्चा सभापती रमजान तांबोळी यांच्याशी केली.चेअरमण समीर काझी यांच्यासह पाटोद्याचे नगरसेवक असिफ सौदागर,सय्यद ख्वाजा बीड आदी मान्यवरांचे स्वागत कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने सभापती रमजान तांबोळी व सचिव हनुमंत गळगटे यांनी केले.

आर्या सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष मा. विनोद (दादा) हातागळे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य कुस्ती मैदानाचे आयोजन

बीड /प्रतिनिधी :

बीड मध्ये येत्या ०७ फेब्रुवारी २०२५ रोजी, दुपारी ०३. ०० वाजता लोकशाहीर अण्णाभाऊ साठे तालुका क्रीडांगण,खंडेश्वरी मंदिरासमोर,पेठ बीड या ठिकाणी भव्य दिव्य अशा कुस्ती मैदानाचे आयोजन करण्यात आले आहे. या सामन्यामध्ये उद्घाटन पर कुस्ती पै.आर्या हातागळे (पाली) याच्या विरुद्ध पैलवान माऊली केकान (होळ) अशा पद्धतीने होणार आहे तर रोमहर्षक कुस्ती सामन्यामध्ये पहिली कुस्ती पै.अक्षय बहिरवाळ (पाली) विरुद्ध पै.अमोल ठोंबरे (शिराढोण) दुसरी कुस्ती पै. बाळू बहिरवाळ (पाटोदा) विरुद्ध मनोज पवार (आष्टी) तिसरी कुस्ती

पै. कृष्णा पवार पाटोदा विरुद्ध पै.पृथ्वीराज वनवे (जामखेड) चौथी कुस्ती पैलवान दादा कदम (पाटोदा) विरुद्ध पै. सय्यद नासिर (जामखेड) पाचवी कुस्ती पै. किरण नहीराळे विरुद्ध पै. माऊली काळे (माजलगाव) सहावी कुस्ती पैलवान विशाल नहीराळे (पाली) विरुद्ध पै.ओंकार भाकरे (बार्शी) सातवी कुस्ती पैलवान किशोर भोसले (पाटोदा) विरुद्ध पै.सुरज शेख (दहिफळ) तसेच या सामन्यांमध्ये आकर्षक कुस्ती म्हणून तेलगाव भावी आमदार केसरी पै. अविनाश हातागळे विरुद्ध पै.सद्दाम शेख (बार्शी) यांच्यासह साठ मोठ्या मोठ्या कुस्त्या लागणार आहेत.

कुस्ती सामन्याचे उद्घाटन डॉ.योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या हस्ते होणार आहे. विशेष सत्कारमूर्ती म्हणून गोल्ड मेडल विजेते पैलवान सुमित बारस्कर यांची उपस्थिती राहणार आहे तर प्रमुख पाहुणे

आकर्षक कुस्ती म्हणून तेलगाव भावी आमदार केसरी पै. अविनाश हातागळे विरुद्ध पै.सद्दाम शेख (बार्शी) यांच्यासह साठ मोठ्या मोठ्या कुस्त्या

म्हणून पैलवान ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष मारोती भाऊ जाधव, माजी उपनगराध्यक्ष अमृत काका सारडा, मा. निजाम सरकार, अखिल भारतीय छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक अण्णा रोमन, मा. रवी भाऊ बोरुडे, आनंददादा सुतार, शेख कदीर भाई यांच्यासह सर्व कुस्तीप्रेमींचे उपस्थिती राहणार आहे. या कुस्ती सामन्याचे निवेदक म्हणून महाराष्ट्रातील प्रसिद्ध निवेदक मोहसीन आतार यांची उपस्थिती राहणार आहे. तरी सर्व कुस्तीप्रेमी, मान्यवर यांनी या कुस्ती सामन्याप्रसंगी उपस्थित रहावे असे आव्हान स्वागत अध्यक्ष स्वप्नील भैया हातागळे यांनी केले आहे.

मी गोपीनाथ मुंडेंची लेक, बोलणं एक आणि करणं एक माझ्या रक्तात नाही-पंकजा मुंडे यांची सभेत गर्जना

आष्टी दि.५ (प्रतिनिधी): मी गोपीनाथ मुंडेंची लेक आहे, बोलणं एक आणि करणं एक माझ्या रक्तात नाही, माझ्याजिल्हयातील शेतक-यांसाठी भूमिका घेताना मी कधीच मागेपुढे पहात नाही. या शब्दात राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडेयांनी भाषणातून चौकार, षटकार ठोकले. मुंडे साहेबांनी तत्कालिन संरक्षण मंत्र्यांना दिलेल्या एका पत्रामुळे इथे होणारे मिल्ट्री ट्रेनिंग सेंटर रद्द झाले आणि शेतक-यांना न्याय मिळाला, ते शेतकरी आजही मुंडे साहेबांचं नाव घेतात असेही त्यांनी ठणकावून सांगितलेले.आष्टी उपसा सिंचन योजना क्र. ३ अंतर्गत येणार्या शिंपोरा ते खुंटेफळ पाईपलाईन कामाची पाहणी तसेच यातील बोगदा कामाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज खुंटेफळ येथे झाला, त्यावेळी त्या बोलत होत्या. पंकजा मुंडे म्हणाल्या, देवेंद्रजी, एक किस्सा आठवला. तुम्ही सीएम म्हणून तुम्हाला बाहुबली म्हणत आहेत. तुम्ही ज्येष्ठ आहात. नेते आहात. तुम्ही कॅबिनेटचे प्रमुख आहात. तुमच्या

विषयी नेहमी आदरभाव असतो. पण आज ममत्व भाव येतोय. कारण ते तुम्हाला बाहुबली म्हणत आहेत. काही वर्षापूर्वी मला शिवगामिनी म्हणत होते. शिवगामिनी ही बाहुबलीची आई आहे. त्यामुळे तुम्हाला बघताना मला आज वेगळाच भाव आला. शिवगामीचं वाक्य असतं, सुरेश अण्णा तुम्ही जसे पिक्चर म्हणता. आम्हीही पिक्चरचे वाक्य म्हणतो. शिवगामीणीचं वाक्य असतं,

मेरा वचनही है मेरा शासन. आणि जे जाहीर वचन सुरेश धस यांना दिलंय. तेच माझं शासन आहे. गोपीनाथ मुंडेची लेक आहे. बोलणं एक आणि करणं एक माझ्या रक्तात नाही, असे पंकजा मुंडे म्हणाल्या.

या ठिकाणी सैनिकी छावणी होण्याचा प्रस्ताव जॉर्ज फर्नांडिस संरक्षण मंत्रीअसताना झाला होता. यावेळी प्रमोद महाजन यांना गोपीनाथ मुंडे यांनी २००३च्या जानेवारीत पत्र दिलं. आणि १९ फेब्रुवारी २००३ जॉर्ज फर्नांडिस यांना पत्र दिलं. इथली ४० गावं माझीआहेत. इथं सैनिकी छावणी करू नका. इथे शेती आहे. बागायती आहे. उपसा जलसिंचन योजना करा, असं त्या पत्रात म्हटलं होतं. आजही ते शेतकरी मुंडे साहेबांच नाव घेतात, असं पंकजा मुंडे म्हणाल्या.आपल्या जिल्ह्यातील शेतकरी व नागरिकांसाठी भूमिका घेताना मागे पुढे पाहायचं नाही ही गोपीनाथ मुंडे यांची भूमिका होती. आजच्या कार्यक्रमाला मी येणार की नाही अशी चर्चा होती. का नाही येणार? सुरेश अण्णा तुम्ही आपल्या जयदत्तचं लग्न केलं. तेव्हा साडी आणि पत्रिका घेऊन आला होता. सागरचं लग्न कराल तेव्हा बोलावलं तर येईल, नाही तर नाही येणार. पण हा कार्यक्रम शासनाचा आहे आणि आज तरी शासन देवेंद्र फडणवीस आणि पंकजा मुंडे मंत्री आहे. तेव्हा मी आले. तुम्ही घरगुती कार्यक्रमाला बोलावलं तर येईल. हा सरकारी कार्यक्रम आहे. बॅनरवर फोटो आहे का हे मी पाहिलं नाही. हा शेतक-यांचा कार्यक्रम आहे, त्यामुळे आले असेही पंकजा मुंडे म्हणाल्या.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ७ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com

केज शहरासह तालुक्यातील सर्व शिधापत्रिका लाभार्थ्यांनी तात्काळ ई-केवायसी करून घ्यावी-असे आवाहन तहसीलदार यांनी केले

केज/प्रतिनिधी
केज शहरासह तालुक्यातील सर्व शिधापत्रिका लाभार्थ्यांनी तात्काळ ई-केवायसी करून घ्यावी-असे आवाहन तहसीलदार यांनी केले आहे तर ई-केवायसी प्रक्रिया शासन स्तरावरून स्वस्त धान्य दुकानदारा मार्फत पूर्णपणे मोफत करण्यात येत असल्याची माहिती प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून देण्यात आली आहे.
याबाबतची सविस्तर माहिती अशी की, सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील सर्व पात्र लाभार्थ्यांना जाहीर आवाहन करण्यात येते की, राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजना अंतर्गत शिधापत्रिका धारकांना शासकीय अनुदानित अन्नधान्याचा लाभ सुरू ठेवण्यासाठी कुटुंबातील रेशन कार्ड म ध्ये नोंदणी केलेल्या सर्व सदस्यांचे ई-केवायसी पूर्ण करणे बंधनकारक आहे.
ज्या सदस्यांची ई-केवायसी मुदतीत पूर्ण होणार नाही त्यांचा अन्नधान्याचा लाभ शासन स्तरावरून बंद होणार आहे.तरी सर्व पात्र लाभार्थ्यांनी तात्काळ आपल्या गावातील रास्त भाऊ दुकानदाराशी संपर्क करून आपले ई-केवायसी पूर्ण करून घ्यावी,ई-केवायसी करण्यासाठी संबंधित लाभार्थी यांनी रास्त भाव दुकानात समक्ष उपस्थित राहून ई-पास मशीनवर बायोमेट्रिक प्रामाणिकरण करून पूर्ण करावे असे आवाहन केज तहसीलचे तहसीलदार राकेश गिड्डे यांनी केले आहे. जर एखाद्या लाभार्थ्यांनी ई-केवायसी पूर्ण न केल्यास अन्नधान्याचा लाभ बंद झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित लाभार्थ्यांची असेल याची नोंद घेण्यात यावी असे प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

लाडक्या बहिणींना आणखी एक मोठा धक्का, आदिती तटकरेंकडून मोठी अपडेट

ज्या कुटुंबांचं आर्थिक उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा कमी आहे, अशा कुटुंबातील महिलांसाठी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली आहे

ज्या कुटुंबांचं आर्थिक उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा कमी आहे, अशा कुटुंबातील महिलांसाठी लाडकी बहीण ही योजना सरकारनं चालू केली आहे. गेल्या वर्षी जुलैपासून या योजनेची अंम लबजावणी करण्यात आली. या योजनेंतर्गत दर महिन्याला लाभार्थी महिलांच्या खात्यामध्ये दीड हजार रुपये जमा करण्यात येतात. आतापर्यंत या योजनेचे एकूण सात हाफ्ते महिलांच्या खात्यात जमा करण्यात आले आहेत. फेब्रुवारी महिन्याचा हाफ्ता देखील लवकरच जामा होण्याची शक्यता आहे. दरम्यान लाडकी बहीण या योजनेचा लाभ घेण्यासाठी शासनाने काही निकष तयार केले आहेत, मात्र या निकषात बसत नसताना देखील अनेक महिलांकडून या योजनेचा लाभ घेतला जात असल्याचं समोर आलं आहे. त्यामुळे आता सरकारकडून अशा महिलांच्या अर्जाची पुन्हा एकदा पडताळणी करण्यात येणार आहे.

ज्या महिला या योजनेच्या निकषात बसत नाहीत, त्यांचा हाफ्ता बंद होण्याची शक्यता आहे. बाकीच्या लाभार्थी महिलांसाठी ही योजना चालूच राहणार आहे. मात्र तरी देखील या योजनेबाबत आता उलट सुलट चर्चा सुरू झाली. यावर पुन्हा एकदा मंत्री आदिती तटकरे यांच्याकडून प्रतिक्रिया देण्यात आली आहे.

नेमकं काय म्हणाल्या आदिती तटकरे?
यासंदर्भात अनेकदा माध्यमांमार्फत माहिती दिलेली आहे. लाडकी बहीण योजना गेल्या जुलैपासून सुरू झाली. जेव्हापासून ही योजना सुरू झाली तेव्हापासून वेगवेगळ्या स्तरावर या योजनेचं क्रॉस व्हेरिफिकेशन करण्यात येत आहे. गेल्या महिन्यात देखील या योजनेत काही डिफॉल्टर्स आढळून आले. जो लाभार्थी या योजनेत बसत नाहीत त्यांना वगळण्यात आलं आहे. ज्यांनी दोन दोनदा या योजनेसाठी अर्ज केला आहे. किंवा जाच्याकडे चार चाकी गाडी असेल त्यांना देखील या योजनेतून वगळण्यात येईल. दर महिन्याला या योजनेच्या निकषात बदल होत असतो. उदहरणार्थ समजा दोन महिन्यांपूर्वी एखाद्या लाभार्थी महिलेकडे चार चाकी नव्हती, मात्र आता ती आहे. त्यामुळे या योजनेचं क्रॉस व्हेरिफिकेशन आवश्यक आहे. या योजनेचे जे काही निकष आहेत, ते शासन निर्णयामध्ये निगमित केलेले आहेत. त्यानुसार ही सर्व प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान तटकरे यांनी दिलेल्या माहितीनुसार आता ज्या महिला निकषात बसत नाही, त्यांचा लाभ बंद होण्याची शक्यता आहे. हा त्यांच्यासाठी मोठा धक्का असणार आहे.

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल आक्षेपार्ह विधान करणा-या राहुल सोलापूरकरच्या प्रतिमेला लिंबागणेश येथे जोडे मारून निषेध :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेशः- (दि.०६) रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी छत्रपती शिवाजी म हाराजांच्या आग्र-याहुन सुटकेच्या प्रसंगाबद्दल केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याच्या निषेधार्थ आज दि.०६ गुरुवार रोजी लिंबागणेश येथील शिवतीर्थ याठिकाणी शिवप्रेमींनी राहुल सोलापूरकर यांच्या विरोधात घोषणाबाजी करत प्रतिमेला जोडे मारून निषेध व्यक्त केला. याचवेळी ईतिहासाची मोडतोड करून हेतुपुरस्सर शिवरायांचा अवमान करून शिवप्रेमींच्या भावना जाणिवपूर्वक दुखावणा-या राहुल सोलापूरकर यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी बालाघाटावरील शिवप्रेमींनी लेखी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, अजितदादा पवार यांना

केली आहे.यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे, शिवशक्ती भिमशक्ती विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील,विक्रांत वाणी , अँड.गणेश वाणी, दामोदर थोरात, अक्षय वाणी,अशोक वाणी,आरूण निर्मळ, जितु निर्मळ,राजेभाऊ मंडलिक, चिंतामण ढास, पांडुरंग वाणी , विवेक बागल, रेवण येडे,रवी वायभट, महावीर वाणी,विशाल येडे , नवनाथ बोराडे,सोनाजी शिंदे, रतन शिंदे,अक्षय येडे आदी सहभागी होते.
सविस्तर माहितीस्तव -अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी एका पॉडकास्ट मध्ये बोलताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या बद्दल आक्षेपार्ह विधान केले होते.शिवाजी महाराज हे चक्क लाच देऊन आग्र-याहुन सुटुन महाराष्ट्रात आले होते.ते मिठाईच्या पेटा-यातुन सुटले ही दंतकथा असल्याचे त्यांनी म्हटले होते.एवढेच नाही तर त्यावेळी पेटारे वगैरे काही नव्हते असं देखील राहुल सोलापूरकर म्हणाले. यामुळे एकंदरीतच राहुल सोलापूरकर यांच्या मनात बहुजन राजांबद्दल द्वेष असल्याचे त्यांच्या वक्तव्यातुन जाणवते. त्यांची मानसिकता ईतिहासाची मोडतोड करून शिवरायांच्या पराक्रमाबद्दल त्यांच्या बुद्धीचातुर्याबद्दल शंका उपस्थित करून महात्म्य कमी करण्याचे षडयंत्र दिसून येत आहे. यामुळे शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या असुन राहुल सोलापूरकर यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला जोडे मारुन निषेध व्यक्त करत त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे.

खो-खो विश्वचषक विजेती कर्णधार प्रियंका इंगळेचा जनविकास महाविद्यालयात भव्य सहकुटुंब सत्कार

प्रियंकाने भारताचे नाव जगात गाजवले-डॉ.बाबासाहेब गोरे

केज/प्रतिनिधी
केज तालुक्यातील बनसारोळा येथील जनविकास म हाविद्यालयात भारताची पहिली महिला खो-खो विश्वचषक विजेती कर्णधार प्रियंका हनुमंत इंगळे हिच्या दैदीप्यमान यशाबद्दल जनविकास महाविद्यालयात सत्कार करण्यात आला.
कार्यक्रमाचे अध्यक्ष म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब गोरे, सत्कारमूर्ती प्रियंका इंगळे तसेच प्रियंकाच्या मातोश्री सौ. सविता इंगळे, वडील श्री. हनुमंत इंगळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रियंका इंगळे हिचा सत्कार म हाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. बाबासाहेब गोरे यांच्या हस्ते बुके, शॉल,स्मृतीचिन्ह व रोख ११ हजार रुपये देऊन सहकुटुंब सत्कार करण्यात आला.
सत्काराला उत्तर देत असताना प्रियंका इंगळे हिने खो-खो खेळाविषयीचे स्वअनुभव सांगून विद्यार्थ्यांनी जे कोणते क्षेत्र निवडले आहे त्या क्षेत्रात स्वतः ला झोकून देऊन परिश्रम केले पाहिजेत असे मत व्यक्त केले.
अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ.बाबासाहेब गोरे यांनी प्रियंकाची कौटुंबिक पार्श्वभूमी सामान्य असतानाही तिने स्वकर्तत्वाने खो-खो सारख्या खेळात सातत्य ठेवून देशातील विश्वचषक खो-खो टीमचे नेतृत्व करून देशाला पहिला विश्वचषक मिळवून देण्याचे काम केले, हे अतिशय महत्त्वाचे असून आमच्या परिसरातील व आमच्या आप्तस्वकीयातील प्रियंकाचा व तीने केलेल्या कामगिरीचाआम्हाला अभिमान असल्याचे मत त्यांनी व्यक्त व्यक्त करून तिच्या पुढील वाटचालीस त्यांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

स्वानंद सार्वजनिक वाचनालयात सुर्यनमस्कार दिन, तानाजी मालुसरे पुण्यतिथी व संत तुकाराम महाराज जयंती संपन्न.

केज/प्रतिनिधीस्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज जि. बीड येथे दिनांक ४ जानेवारी २०२५ रोजी जागतिक सुर्य नमस्कार दिन व तानाजी मालुसरे यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.दिनांक २ जानेवारी २०२५ रोजी जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.४ जानेवारी २०२५ रोजी जागतिक सुर्यनमस्कार दिन विविध आसने करून मुला मुलींनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून सुर्य नम स्काराचे प्रात्यक्षिक केले.त्यानंतर तानाजी मालुसरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन करणात आले.मुला - मुलींनी तानाजी मालुसरे व सुर्यनमस्कार दिनाचे महत्व यावर उत्स्फुर्त भाषणे केली.प्रमुख पाहुणे म्हणून कल्याणी भोगनकर, साक्षी गायकवाड, कृष्णा गायकवाड, दिव्या साबळे, एस. के. वैरागे, शौर्य गायकवाड, राहण गायकवाड यांची उपस्थिती होती.अध्यक्ष स्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, माजी प्राचार्य, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.दिनांक २ जानेवारी २०२५ रोजी जगद्गुरू संत तुकाराम महाराज जयंती साजरी करण्यात आली. सर्व प्रथम संत तुकाराम महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले.संत तुकाराम महाराजांच्या प्रतिमेचे पुजन बबन पुंड, नानासाहेब जाधव, दत्तात्रय कदम, एस. के. वैरागे यांच्या हस्ते ततिम ेला पुष्पहार घालून करण्यात आले.मान्यवरांनी थोडक्यात मनोगत व्यक्त केले.अध्यक्ष स्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, माजी प्राचार्य, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.दोन्ही वेगवेगळ्या कार्यक्रमाचे प्रस्ताविक, सुसंचलन, आभार प्रदर्शन आनंद गायकवाड यांनी केले.दोन्ही वेगवेगळया कार्यक्रम ाला विद्यार्थी - विधार्थीनींची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

समृद्धी महामार्ग प्रमाणे शक्तिपीठ मार्गाचाही विरोध मावळेल : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
नांदेड : महामार्ग हे विकासाचे गेमचेंजर म्हणून सिद्ध होतात. समृद्धी महामार्गाने हे सिद्ध केले आहे. सुरूवातीला समृद्धी महामार्गाला विरोध होता. समृद्धी सारखाच या शक्तीपीठ महामार्गाचा विरोध देखील हळूहळू मावळेल, असा आशावाद उपमुख्यमंत्री तथा राज्याचे नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे यांनी नांदेडमध्ये व्यक्त केला.
एकनाथ शिंदे एक दिवसाच्या नांदेड दौ-यावर आले होते. दिवसभरात त्यांचे विविध कार्यक्रम होते. दुपारी गुरुगोविंद सिंघजी नांदेड विमानतळावर आगमनानंतर त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. त्यानंतर त्यांनी नांदेड येथील पवित्र श्री हुजूर साहिब सचखंड गुरूद्वारा येथे भेट देऊन दर्शन घेतले. दुपारी त्यांनी जाहीर सभेला संबोधित केले.
सायंकाळी पत्रकारांशी बोलताना त्यांनी शक्तिपीठ महामार्गाचा विरोध ओसरेल असे स्पष्ट केले. ते म्हणाले समृद्धी किंवा शक्तिपीठ सारखे महामार्ग केवळ दळणवळणाची व्यवस्था नाही तर या भागातील कृषीवर आधारित अर्थव्यवस्थेला गती देणारे नवीन मॉडेल आहे. शक्तिपीठ महामार्गाचे महत्व कळल्यावर. भविष्यातील दळणवळणाचे व विकासाचे महत्त्व पटल्यानंतर, विरोध

मावळतो. शक्तिपीठ महामार्ग कुठेही जनतेवर लादणार नाही, असे सांगताना जिथे विरोध आहे तिथे काम केले जाणार नाही. त्याठिकाणी रस्त्याची अलाइनमेंट बदलली जाईल. त्याचवेळी त्या-त्या भागाची कनेक्टिव्हिटीही म हत्त्वाची आहे.
समृद्धी महामार्गाला प्रारंभी विरोध होता; मात्र त्याची उपयुक्तता सिद्ध होताच विरोध मावळला आहे. अशीच परिस्थिती शक्तिपीठ महामार्गाची असल्याचे शिंदे यांनी सांगितले. सर्वांनी या मोठ्या प्रकल्पासाठी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

कोणत्याच योजना बंद होणार नाही
राज्य शासनाची महत्त्वकांक्षी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना असो वा राज्य सरकारने सुरू केलेल्या कोणत्याही योजना बंद केल्या जाणार नाहीत, तसेच यापूर्वीच्या कोणत्याही चांगल्या योजना बंद होणार नाहीत,अशी स्पष्ट ग्वाही त्यांनी दिली. उलट मराठवाड्याची दुष्काळवाडा अशी असलेली ओळख दूर करण्यासाठी बंद पडलेल्या योजना महायुती सरकार पुन्हा सुरू करीत असल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. बंद पडलेल्या मराठवाडा वॉटर ग्रीड, जलयुक्त शिवार योजना, पुन्हा सुरू करून मराठवाड्यातील पाण्याचा प्रश्न दूर करण्यात येईल. मराठवाड्यासाठी ११ जलसिंचन योजनांना मंजुरी दिल्याचेही शिंदे यांनी सांगितले.

यावेळी त्यांच्यासोबत बाळासाहेब ठाकरे हरिद्रा संशोधन केंद्राचे अध्यक्ष आ. हेमंत पाटील,आ. बालाजी कल्याणकर, आ.बाबुराव कदम कोहळीकर, आ.आनंद पाटील बोंढारकर, आ. संतोष बांगर यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

नांदेडचे नवे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी पदभार स्वीकारला

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
नांदेड : नांदेड जिल्ह्याचे नवे जिल्हाधि-कारी राहुल कर्डिले दि.६-फेब्रुवारी गुरुव-ारी सकाळी रुजू झाले.पूर्व जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्याकडून त्यांनी पदभ-ार स्वीकारला.यावेळी त्यांचे जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये वरिष्ठ अधिका-यांमार्फत स्व-ागत झाले. यावेळी मावळते जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्यासह जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, महानगरपालिका आयुक्त डॉ. महेश डोईफो-डे, सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली, अतिरिक्त जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व कर्मचा-यांनी त्यांचे स्वागत केले.
जिल्हाधिकारी श्री. राहुल कर्डिले यापू-र्वी सिडकोचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत होते. सन २०१५ च्या तुकडीचे आयएएस अधिकारी असण-ारे राहुल कर्डिले यांनी यापूर्वी अमरावती सहाय्यक जिल्हाधिकारी , परभणी सहाय्यक जिल्हाधिकारी, चंद्रपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, वर्धा जिल्हाधिकारी आणि सिडकोचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक आदी पदे त्यांनी भूषविली आहेत. मावळते जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांची छत्रपती संभाजी नगर येथे वस्तू व सेवा कर सहआयुक्त पदावर बदली झाली आहे. अभिजीत राऊत गेल्या अडीच वर्षापासून नांदेड येथे जिल्हाधिकारी पदावर कार्यरत होते.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com